आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक वृत्त विभाग
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
बुधवार, दिनांक ३१ जुलै २०२४

ठळक बातम्या

1. महाराष्ट्राचे नवनियुक्त राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांचा शपथविधी समारंभ आज संध्याकाळी साडेसहा वाजता राजभवनात होणार.
2. राज्यात आज सकाळी 11 वाजेपर्यंत 1 कोटी 63 लाख 60 हजार पीकविमा अर्ज दाखल, आज विमा भरण्याचा अखेरचा दिवस - कृषी मंत्री धनंजय मुंडे यांची माहिती.
3. केंद्रीय लोकसेवा आयोगाचे नियम भंग केल्याप्रकरणी पूजा खेडकर हिचं प्रशिक्षणार्थी IAS पद रद्द, भविष्यातील सर्व परीक्षा देण्यास बंदी.
4. राज्यात ८१ हजार १३७ कोटी रुपयांच्या गुंतवणुकींना मान्यता, नागपुरात येणार तीन प्रकल्प.
5. अमरावती, गडचिरोली, नाशिक, अहिल्यानगर जिल्ह्यात नवीन ‘एमआयडीसी’साठी तातडीने प्रस्ताव सादर करण्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निर्देश.

****

राज्यपाल

महाराष्ट्राचे नवनियुक्त राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांचा शपथविधी समारंभ आज संध्याकाळी साडे सहा वाजता राजभवनात होणार आहे. सी. पी. राधाकृष्णन हे झारखंडचे राज्यपाल होते. काल मावळते राज्यपाल रमेश बैस यांना राजभवनात आयोजित समारंभात निरोप देण्यात आला.राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी २८जुलै रोजी विविध राज्यांमध्ये राज्यपालांची नियुक्ती केली होती. त्यापैकी काही राज्यपालांनी शपथ घेतली असून काहींचा शपथविधी सोहळा आज संध्याकाळी होणार आहे. दरम्यान, हरिभाऊ बागडे यांनी आज जयपूर येथील राजभवनात आयोजित कार्यक्रमात राजस्थानचे राज्यपाल म्हणून शपथ घेतली. राजस्थान उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश एम एम श्रीवास्तव यांनी त्यांना शपथ दिली.

लोकसभा-भारत नेट

भारत नेट योजनेत साडे नऊ हजार ग्रामपंचायती पूर्णपणे इंटरनेट सुविधेने जोडल्या गेल्या असून, महाराष्ट्रातला शहरी भाग शंभर टक्के तर नव्वद टक्के ग्रामीण भाग इंटरनेटने जोडला गेला आहे. केंद्रीय दूरसंचार मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी आज लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासात ही माहिती दिली. गडचिरोलीचे काँग्रेसचे खासदार नामदेव किरसन यांनी हा मुद्दा उपस्थित केला होता. देशभरात चोवीस हजार गावांमध्ये कनेक्टिव्हीटी साठी बावीस हजार कोटी रुपयांची योजना राबवली जात आहे. गडचिरोलीचाही त्यात समावेश असल्याचं, शिंदे यांनी सांगितलं. देशभरात सहा लाखांवर गावं भारत नेटच्या पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यात जोडले गेले आहेत. उर्वरित ग्रामपंचायती यामध्ये जोडण्यासाठी एक लाख एकोणतीस हजार कोटी रुपयांची सुधारित योजना केंद्र सरकार राबवणार असल्याचं, शिंदे यांनी अन्य एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितलं. इंटरनेट सुविधेचा दर तीन पैसे प्रतिमिनीट पर्यंत कमी केला असून, मोबाईल डेटा नऊ रुपये बारा पैसे पर जीबी दराने उपलब्ध असल्याची माहितीहि त्यांनी यावेळी दिली.

## प्रधानमंत्री पीक विमा

खरीप २०२४ हंगामात प्रधानमंत्री पीक विमा योजनेत सहभागी होण्याचा आज अखेरचा दिवस आहे. आज सकाळी ११ वाजेपर्यंत राज्यात एक कोटी त्रेसष्ट लाख साठ हजार पेक्षा अधिक पीकविमा अर्ज दाखल करण्यात आले आहेत. उर्वरित पात्र शेतकऱ्यांनी आपला विमा तात्काळ भरून घ्यावा असं आवाहन राज्याचे कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी केलं आहे. दरम्यान, यापूर्वी जाहीर हेक्टरी पाच हजार रुपये अनुदानापोटी, राज्यातील सुमारे त्रेपन्न लाख त्र्याऐंशी हजार सोयाबीन उत्पादकांना दोन हजार सहाशे बारा कोटी तर सुमारे तीस लाख कापूस उत्पादक शेतकऱ्यांना दीड हजार कोटी रुपये लाभाचे वितरण थेट त्यांच्या संलग्न बँक खात्यांमध्ये करण्यात येत असल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

## पूजा खेडकर

केंद्रीय लोकसेवा आयोग अर्थात यूपीएससीने पूजा खेडकरविरुद्ध कारवाई केली असून तिचे प्रशिक्षणार्थी IASपद रद्द करण्यात आलं आहे.त्याचबरोबर भविष्यातील सर्व परीक्षांना बसण्यास पूजा यांच्यावर बंदी घालण्यात आली आहे. यूपीएससीने केलेल्या चौकशीत पूजा खेडकरने नागरी सेवा परीक्षा-2022च्या नियमांचा भंग केल्याचं समोर आल्यानंतर ही कारवाई करण्यात आली आहे. यूपीएससीने 19 जुलै रोजी एक पत्रक प्रसिद्ध करून पूजा खेडकर यांनी स्वतःच्या नावात, त्यांच्या वडिलांच्या नावात तसेच आईच्या नावात बदल करून केंद्रीय लोकसेवा आयोगाची फसवणूक केल्याचं समोर आल्याचं म्हटलं होतं. खेडकर यांनी परीक्षेचा फॉर्म भरत असताना फोटो, सही, ईमेल आयडी, मोबाईल नंबर आणि पत्ता बदलून परीक्षा देण्याची कमाल मर्यादा ओलांडली असल्याचंही यूपीएससीने स्पष्ट केलं होतं.

## धैर्यशील माने

लोकसभेतील शिवसेना संसदीय पक्षाच्या उपनेतेपदी खासदार धैर्यशील माने यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. माने यांच्या निवडीचे पत्र शिवसेना पक्षाचे प्रमुख नेते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लोकसभा अध्यक्षांकडे सादर केले. शिवसेना पक्षाच्या लोकसभेतील गटनेतेपदी कल्याणचे खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांची निवड यापूर्वीच करण्यात आली आहे.

## पोलिस खबऱ्या हत्या

२८ जुलैपासून सुरू असलेल्या शहीद सप्ताहादरम्यान नक्षल्यांनी भामरागड तालुक्यातील मिळगुडवंचा या दुर्गम गावातील लालू मालू धुर्वा नामक ४० वर्षीय इसमाची पोलिस खब-या असल्याच्या संशयावरून हत्या केली. ही घटना आज पहाटेच्या सुमारास उघडकीस आली. काल रात्री सशस्त्र नक्षल्यांनी लालू धुर्वा यास झोपेतून उठवून बाहेर नेले आणि त्यानंतर त्याची हत्या केली. नक्षल्यांनी मृतदेहाजवळ सोडलेल्या चिठ्ठीत हत्येचे कारण लिहिले आहे. २८ जुलै ते ३ आगस्ट या कालावधीत नक्षलवादी शहीद सप्ताह साजरा करतात. २५ जुलै रोजी भामरागड तालुक्यातील आरेवाडा येथे जयराम कोमटी गावडे याची नक्षलवाद्यांनी बंदुकीच्या गोळीने हत्या केली होती. त्यानंतर ही दुसरी हत्या आहे. यासंदर्भात पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी घटनेला दुजोरा दिला असून, प्रचंड नैराश्यामुळे नक्षलवादी निरपराध नागरिकांचा बळी घेत असल्याचं सांगितलं . त्या परिसरात नक्षलविरोधी अभियान तीव्र करणार असल्याचंही ते म्हणाले.

## राज्यात गुंतवणूक, नागपूर तीन प्रकल्प

राज्यात गुंतवणुकदारांचा ओघ वाढत असून ८१ हजार १३७ कोटी रूपये गुंतवणुकीच्या विशाल आणि अतिविशाल अशा सात प्रकल्पांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उद्योग

विभागाच्या मंत्रीमंडळ उपसमितीत मंजुरी देण्यात आली आहे. यामध्ये उच्च तंत्रज्ञानावर आधारित लिथियम बॅटरी, इलेक्ट्रीक व्हेईकल, सेमीकंडक्टर चिप, फळांचा पल्प निर्मिती प्रकल्पांचा समावेश असून विदर्भासह कोकण आणि मराठवाडा इथ मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होणार असून, त्यामुळे राज्यात सुमारे २० हजार प्रत्यक्ष रोजगार उपलब्ध होणार आहे. विदर्भात जेएसडब्ल्यू एनर्जी पीएसपी इलेव्हन लि.,यांचा लिथियम बॅटरी निर्मितीचा २५ हजार कोटी रुपये गुंतवणुकीचा अतिविशाल प्रकल्प नागपूर भागात होणार आहे. ज्यामुळे ५००० पेक्षा अधिक रोजगार निर्मिती होणार आहे. तर १ हजार ७८५ कोटी रुपये गुंतवणूकीचा परनॉर्ड रिकार्ड इंडिया प्रा.लिमिटेड मार्फत मद्यार्क निर्मितीचा विशाल प्रकल्प अतिरिक्त बुटीबोरी एमआयडीसी इथं स्थापन होणार आहे. याशिवाय आवाडा इलेक्ट्रो कंपनीचा सोलर पीव्ही मॉड्यूल्स आणि इलेक्ट्रोलायझरचा एकात्मिक प्रकल्प, अतिरिक्त एमआयडीसी, बुटीबोरी आणि एमआयडीसी भोकरपाडा, रायगड या परिसरात उभारण्यात येणार आहे. कंपनीमार्फत नवीकरणीय ऊर्जा स्रोताचा उच्च तंत्रज्ञानावर आधारित राज्यात प्रकल्प स्थापित होणार आहे. प्रकल्पामध्ये एकूण १३ हजार ६४७ कोटी एवढी गुंतवणूक होणार असून, याद्वारे ८००० पेक्षा अधिक रोजगार निर्मिती होणार आहे.

## मुख्यमंत्री

दरम्यान, महाराष्ट्र हे उद्योगस्नेही आणि गुंतवणूकीसाठी पहिल्या पसंतीचे राज्य आहे. अनेक जपानी कंपन्या राज्यात चांगल्या पद्धतीने काम करत आहेत. भविष्यात देखील जपानने राज्यात उद्योग आणि पायाभूत सुविधा क्षेत्रात गुंतवणूक वाढवावी, असं आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलं. जपानचे नवनियुक्त कॉन्सुलेट जनरल यागी कोजी यांनी आज मुख्यमंत्र्यांची वर्षा निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली.

## नवीन 'एमआयडीसी'

राज्याच्या उत्पन्नवाढी बरोबरच रोजगार निर्मितीसाठी उद्योगांची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. त्यासाठी गडचिरोली जिल्ह्यातील देसाईगंज, अहिल्यानगर जिल्ह्यातील लिंगदेव, नाशिक जिल्ह्यातील कळवण-सुरगाणा, जांबुटके तसेच अमरावती जिल्ह्यातील वरुड इथं 'एमआयडीसी' उभारण्यासाठी परिपूर्ण प्रस्ताव तातडीने सादर करावेत. तसेच राज्यात यापुढे नवीन 'एमआयडीसी' उभारण्यासाठी किमान शंभर एकर जमिनीची उपलब्धता करुन देण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज दिले. 'एमआयडीसी'ची आढावा बैठक उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील त्यांच्या समिती कक्षात आयोजित करण्यात आली होती.त्यावेळी त्यांनी हे निर्देश दिले.

## पॅरिस ऑलम्पिक

पॅरीस ऑलिम्पिकमध्ये भारताच्या हॉकी संघाने काल आयर्लंडचा २-० असा पराभव करत पुढील फेरीत प्रवेश केला आहे. आज तिरंदाजी वैयक्तिक प्रकारात भजन कौर हिनं शानदार खेळाचं प्रदर्शन करत सोळाव्या फेरीत प्रवेश केला, तर अंकिता भकट आणि धीरज बोम्मादेवरा ३२ व्या फेरीतून बाहेर पडले. बॅडमिंटनमध्ये सात्विक साईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या जोडीनं सलग दुसऱ्या सामन्यात विजय मिळवून उपांत्यपूर्व फेरीकडे आगेकूच केली आहे. दोन वेळा ऑलिम्पिक पदकविजेती पी. व्ही. सिंधू हिनं पॅरिस ऑलिम्पिकच्या पुढच्या फेरीत प्रवेश केला आहे. त्याचप्रमाणं पुरुष एकेरीत लक्ष्य सेनने अंतिम १६ मध्ये जागा मिळवली आहे. मात्र अमित पंघल, जास्मीन लमोबोरिया आणि प्रीती पवार या मुष्टियोद्ध्यांचा पराभव झाल्यानं त्यांच्या पदरी निराशा पडली.

हवामान

विदर्भात गडचिरोली जिल्ह्यात आज मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला असून, चंद्रपूर आणि असल्याने यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. उद्या देखील गडचिरोली जिल्ह्यात गोंदिया जिल्ह्यात देखील जोरदार पाऊस येण्याची शक्यता मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट कायम राहणार असून, गोंदिया आणि चंद्रपूर इथं देखील ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा इथे देखील पावसाची शक्यता असल्याने येलो अलर्ट जारी करण्यात आला.

*****